मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २९१ सातारा ▪ रविवार ▪ दि. ७ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# तर आपण रनआऊट होणार, फडणवीसांचा महायुतीला सल्ला

**मुंबई** : महायुतीच्या मेळाव्यात देवेंद्र फडणवीस यांनी तिन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना मर्गदर्शन केलं.

महायुतीचे प्रवक्ते नेते हल्ली जी वक्तव्ये करतात त्यातून आपल्यात विसंवाद असल्याचं चित्र निर्माण होत आहे. त्यामुळे सर्वांनी जपून वक्तव्ये करा, असा सल्ला उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र भाजपाचे वरिष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना, प्रवक्त्यांना दिला आहे. शनिवारी (६ जुलै)



## विधानसभेच्या जागा सांगत रणशिंग फुंकलं

संध्याकाळी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात शासकीय योजना आणि अंमलबजावणी संदर्भात महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक पार पडली. यावेळी फडणवीस बोलत होते. फडणवीस म्हणाले, कुणाला (महायुतीतील प्रवक्ते, पदाधिकारी, नेते) एकमेकांविरोधत बोलायची खुमखुमी आली असेल तर त्याने त्याच्या नेत्यांकडे जाऊन विचारायला हवं. त्यांनी आपल्या नेत्याला जाऊन विचारावं की मला बोलायची खुमखुमी आली आहे, मी बोलू का? तुमच्या नेत्यांनी परवानगी दिली तर खुशाल बोला आणि तुमची खुमखुमी दूर करून घ्या. मात्र, एक गोष्ट लक्षात घ्या आपण सर्वजण एक आहोत आणि एकच राहिलं पाहिजे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, विरोधक आपल्याविरोधात प्रचार करत आहेत, आपण एकत्र नसल्याचा अपप्रचार करू लागले आहेत. आपण जेव्हा एकमेकांविरोधात वक्तव्ये करतो तेव्हा दुर्दैवाने त्यांच्या या प्रचाराला अधिक बळ देत असतो. अशाने आपणच हिट विकेट होतो, रन आऊट होतो, ही स्थिती योग्य नाही. अजित पवार यांनी आधीच स्पष्ट केलं आहे की पक्षांमधील वरिष्ठ नेते तिकीट वाटप करतील. कोणाला कुठली जागा मिळणार? हे मंचावरील वरिष्ठ नेते ठरवतील. मी, अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीमधील वरिष्ठ नेते एकत्र बसून, चर्चा करून, एकमेकांच्या सल्ल्याने निर्णय घेऊ.

उपमुख्यमंत्री म्हणाले, आपण युतीत असतो तेव्हा प्रत्येक नेत्याच्या, कार्यकर्त्यांच्या काही इच्छा, अपेक्षा असतात. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा, प्रत्येकाच्या आकांक्षा असल्या तरी प्रत्येक पक्षाला काही ना काही तडजोडी कराव्या लागतात आणि आपण प्रत्येकाने तडजोडीचीच भूमिका घ्यायला हवी. तडजोडीची भूमिका घेतली नाही तर युती टिकत नाहीत. मी माझं पाहून घेतो, दुसऱ्याचं काय व्हायचं ते होऊ दे, ही भूमिका चालणार नाही. असं केलं तर आपला घात होऊ शकतो.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी टोचले कार्यकर्त्यांचे कान

## आता आपल्याला ताकही फुंकून प्यायचं आहे



**मुंबई** : महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महायुतीला फटका बसल्यानंतर आता महायुतीच्या नेत्यांनी महाराष्ट्र विधानसभेसाठी जोमाने तयारी सुरु केली आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला अवघ्या १७ जागा मिळवता आल्या. तर ३० जागा मिळाल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास भलताच दुणावला आहे. या सगळ्या घडामोडी घडत असताना महायुतीचा मेळावा मुंबईत पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ताकही फुंकून प्यायचं आहे असं म्हणत कार्यकर्त्यांना कानपिचक्या दिल्या.

काय म्हणाले एकनाथ शिंदे?

विधानभवनात आपण विश्वचषक जिंकलेल्या खेळाडूंचा सत्कार आयोजित केला होता. त्यावेळी देवेंद्र फडणवीस असं म्हणाले की महाराष्ट्रात काय घडेल, कधी कोण सरकार स्थापन करेल हे सांगता येत नाही. कारण २०१९ मध्ये महायुतीला कौल मिळाला होता. पण महाविकास आघाडीचं सरकार आलं. पण मी सांगू इच्छितो की महाविकास आघाडीलाही वाटलं नव्हतं की आपलं सरकार जाईल आणि महायुतीचं येईल. त्यामुळे मी एक शेर ऐकवतो, 'मै अकेला ही चला था जानिब ए मंजिल, मगर लोक साथ आते गये और कारवाँ बनता गया.' आपला कारवाँ आता मोठा झाला आहे. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्राने मोठा उठाव पाहिला. नागरिकांच्या आणि मतदारांच्या विश्वासघाताच्याविरोधातला तो उठाव होता.आम्ही धाडसी निर्णय घेऊन महायुतीचं सरकार आणलं. हे सरकार लोकांच्या भूमिकेतलं आहे, बाळासाहेबांच्या विचारांचं आहे. ५० आमदार बरोबर होते, त्यानंतर १३ खासदार आले. लाखो कार्यकर्ते आले. देवेंद्र फडणवीस यांची मला साथ लाभली. असं एकनाथ शिंदे म्हणाले.

महायुतीचं सरकार आल्याने महाराष्ट्राचं चित्र पालटलं

अजित पवार बरोबर आल्याने ताकद वाढली आहे. महायुतीने महाराष्ट्राचं चित्र पालटलं आहे. अडीच वर्षात त्यांनी स्टे देऊन सगळ्या गोष्टींना स्पीडब्रेकर टाकून ठेवले होते. सगळं बंद होतं आणि फेसबुक सुरु होतं. तसंच वर्क फ्रॉम होम चाललं होतं. मात्र आपलं सरकार आल्यावर आनंदाचं वातावरण निर्माण झालं. दहीहंडी उत्सवाने सुरुवात केली आणि आपलं सरकार आल्यावर सगळे सण उत्सवही जोरात, जोशात आणि जल्लोषात साजरे होऊ लागले. राज्यात समृद्धी, आनंदाचं वातावरण तयार झालं. कारण महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा बंद होता कामा नये. राज्याचं वर्तमान आपण सुधारलं आहे आणि भविष्य सुधारण्याचा ध्यास घेतला आहे. इथे उपस्थित असलेले सगळेजण आपली ताकद आहे.

# लोकसभेला सत्ताधाऱ्यांना मतदारांनी जागा दाखवली : खा.सुप्रियाताई सुळे

## कोंढवा येथे खासदार डॉ.अमोल कोल्हे व सुप्रियाताई सुळे यांचा सत्कार

**हडपसर** : काश्मीर ते कन्याकुमारी आपला अखंड भारत देश एक आहे. हे मतदारांनी लोकसभा निवडणुकीत सत्ताधा-यांना दाखवून दिले आहे. हे सरकार कधी पर्यंत चालेल माहीत नाही, मात्र आम्ही सरकार अस्थिर करणार नाही. हे कॉपी करून आलेले सरकार आहे. लोकसभा निवडणुकीत महिला कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना धमकावण्यात आले. या पार्श्वभूमीवर आगामी विधानसभेत कितीही धमकी येऊ द्या ' बहिणीनो डरना मना आहे ' आता येणाऱ्या विधानसभेसाठी ७० दिवस शिल्लक राहिलेत, घरोघरी आपल्याला पोहोचून महाविकास आघाडीचे सरकार राज्यात आणायचे आहे, असे



आवाहन संसदरत्न खा.सुप्रिया सुळे यांनी कोंढवा येथे सत्कार समारंभात आपले मत व्यक्त केले.

शिरूर लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार डॉ. अमोल कोल्हे व बारामती मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केले होते. यावेळी माजी आमदार जगन्नाथ शेवाळे, जाहेद सय्यद, माजी उपमहापौर निलेश मगर, माजी नगरसेवक योगेश ससाणे, रवींद्र माळवदकर, हेमंत बधे, वंदना मोडक, सविता मोरे, रुपाली शिंदे, आसिफ शेख, पप्पू घोलप, दिपक कामठे, मोहमद्दीन खान, बाळासाहेब कवडे, आसिफ पटेल, रोहित गुंजाळ आदी उपस्थित होते.

पुढे सुप्रिया सुळे म्हणाल्या की,आताचे हे भाजपचे सरकार नसून महागाई , बेरोजगार, भ्रष्टाचाराचे सरकार आहे. असे बोलून सुप्रिया सुळे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले,

हा देश तुमचा आमचा सर्वांचा आहे. जाती भेदाच्या भिंती तोडून देश एकसंघ कसा राहील हे पाहण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. ज्या विश्वासाने मतदारांनी मला मतदान केले आहे त्या विश्वासाला मी कुठेही तडा जाऊ देणार नाही.

हडपसर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या इच्छुकांची घाऊक गर्दी दिसून आली. वेगवेगळे पदाधिकारी वाजत गाजत कार्यकर्त्यांच्या गर्दी जमा करून आपले शक्ती प्रदर्शन दाखवीत होते. आगामी विधानसभेच्या निवडणुकीनंतर लागलीच महापालिकेची निवडणूक होणार असल्याने इच्छुकांनी आपल्या नेत्यांपुढे शक्तिप्रदर्शन केले.

यावेळी शैलेश बेल्हेकर, शादाब खान, यांचा पक्षात प्रवेश झाला.

प्रशांत जगताप यांना विधानसभा उमेदवारीचे खा.सुप्रिया सुळेंकडून संकेत

केंद्र व राज्य सरकारचे विरोधात तसेच महागाई बेरोजगारी अनेक मुद्द्यांवर प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली पुण्यावर मोठ्या प्रमाणात आंदोलने होतात या आंदोलनाची राज्यात चर्चा होते सर्वसामान्यांचे आवाज उठवण्याचे काम प्रशांत जगताप करतात लोकसभेला तुमची साथ राहिली विधानसभेलाही साथ द्या असे आवाहन करत प्रशांत जगताप यांना हडपसर विधानसभा उमेदवारीचे खासदार सुप्रिया सुळे यांनी संकेत दिले.

# कांदा निर्यात बंदी करू नका, त्याने अनेकांना, अजित पवारांची पीयूष गोयल यांना विनंती

**मुंबई** : काहीही करून कांदा निर्यात बंदी करू नका, अशी विनंती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्याकडे केली आहे. या कांद्याने आम्हाला रडवलंय असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

दरम्यान, अजित पवार यांनी सांगितलं, आपण दुधासाठी पाच रुपयाचं अनुदान देत आहोत, काल राज्य मंत्रिमंडळाची एक बैठक पार पडली. त्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दूध पावडरची निर्यात करण्यासही परवानगी देण्यात आली आहे. यासह राज्य



सरकारने शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांची अजित पवार यांनी यावेळी माहिती दिली.

शनिवारी (६ जुलै) संध्याकाळी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात शासकीय योजना आणि अंमलबजावणी संदर्भात महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत अजित पवार बोलत होते. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पीयूष गोयल, केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) प्रतापराव जाधव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, माजी मंत्री पंकजा मुंडे व आमदार आशिष शेलार उपस्थित होते.महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना अजित पवार म्हणाले, इथे पीयूष गोयल उपस्थित आहेत. मला त्यांना एक विनंती करायची आहे. काहीही करून कांदा निर्यात बंदी करू नका. त्या कांद्याने अनेकांना अक्षरशः रडवलं आहे. त्या कांद्यामुळे आपल्या नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये कित्येक अडचणी निर्माण झाल्या.

# स्वबळाची परीक्षा की मित्रपक्षांवर दबाव?

## काँग्रेसने सर्वच मतदारसंघातील इच्छुकांकडून मागविले अर्ज

**मुंबई** : लोकसभा निवडणुकीत अनपेक्षित पणे चमकदार कामगिरी करणाऱ्या काँग्रेसचे मनोबल चांगलेच वाढले असून पक्षाने राज्यातील सर्व २८८ मतदारसंघातून इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविले आहेत. त्यामुळे काँग्रेस खरोखरच या निवडणुकीत स्वबळाची परीक्षा देणार की महाविकास आघाडीतील मित्रपक्षांवर अधिक जागा मिळवण्यासाठी दबाव टाकण्याचे हे तंत्र आहे, याबद्दल राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

राज्यात शिवसेना उद्धव ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांची महाविकास आघाडी आहे. लोकसभेप्रमाणेच आगामी विधानसभा निवडणुका महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढविणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी नुकतेच जाहीर केले आहे., शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे देखील वारंवार तिन्ही पक्ष एकत्र आल्यामुळेच भाजपाला रोखण्यात यश मिळाले याचा उल्लेख वारंवार करीत असतात. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे काँग्रेसची वाताहात झालेली असताना देखील स्वबळाची भाषा वापरत आले आहेत. त्यामुळे त्याला कोणी फारसे गांभीर्याने घेताना दिसत नाही. तरीही या निवडणुकीत सर्व मतदारसंघातील इच्छुकांकडून काँग्रेसने अर्ज मागविल्यामुळे राजकीय वर्तुळात उत्सुकता ताणली गेली आहे.

मागील लोकसभा निवडणुकीत दारुण परिस्थितीत आलेल्या काँग्रेसला महाविकास आघाडीच्या माध्यमातून यावेळी लोकसभा निवडणूक लढवताना तब्बल १३ जागा मिळाल्याने नवसंजीवनी प्राप्त झाली आहे. काँग्रेसने एकूण १७ जागा लढविल्या होत्या. सांगलीचे विशाल पाटील बंडखोरी करून निवडून आले असले तरीही ते कट्टर काँग्रेसचे असल्यामुळे राज्यातील काँग्रेसच्या खासदारांची संख्या १४ झाली आहे. त्यामुळे काँग्रेसचा आत्मविश्वास भलताच वाढला आहे. अशावेळी मित्रपक्षांवर दबाव आणून विधानसभा निवडणुकीत अधिकाधिक जागा आपल्या पदरी पाडून घेण्याचा डावपेचाचा भाग म्हणून काँग्रेसने सर्वच जागांवर निवडणूक लढविण्याची आपली तयारी असल्याचे दर्शविण्यासाठी इच्छुकांकडून अर्ज मागितले असण्याची शक्यता आहे. अन्यथा कितीही आव आणला तरीही स्वबळावर निवडणूक लढविण्यास काँग्रेस अद्याप पुरेशी सशक्त झालेली नाही हे स्पष्ट आहे.

# मराठा ओबीसी वाद महाराष्ट्राच्या हिताचा नाही : अशोक चव्हाण

**जालना** : सध्याच्या काळात राज्यातील गावागावात मराठा आणि इतर मागासवर्गीय समाजात वितुष्ट निर्माण झाल्याचे चित्र आहे. दोन समाजघटकांमधील हा वाद महाराष्ट्राच्या हिताचा नाही. या संदर्भात आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना भेटून त्यांच्याशी सविस्तर चर्चा करणार आहोत, असे खासदार अशोक चव्हाण यांनी सांगितले.

राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न संवेदनशील बनला आहे. इतर मागास प्रवर्गातूनच टिकणारे आरक्षण मिळावे, त्याच बरोबर कुणबी नोंदी सापडलेल्या लोकांच्या सगे सोयऱ्यांनाही आरक्षणाचा लाभ मिळावा, हैदराबाद आणि इतर संस्थानांच्या नोंदी ग्राह्य मानल्या जाव्या, अशा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख मागण्या



आहेत. दुसरीकडे मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गात समाविष्ट न करता स्वतंत्र आरक्षण द्यावे या मागणीसाठी इतर मागास समाज रस्त्यावर उतरला आहे.

या संदर्भात चव्हाण यांनी शुक्रवारी रात्री जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. आपल्याला जरांगे पाटील यांची भेट घेण्यास कोणीही पाठवलेले नाही. मराठा समाजाचा एक कार्यकर्ता म्हणून आपण ही भेट घेतली, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, असे आपले व्यक्तिगत मत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा आणि ओबीसी यांच्यात समन्वयाचे प्रयत्न

सध्या दोन समाजात निर्माण झालेली तेढ मिटविण्यासाठी मराठा आणि इतर मागासवर्गीय तरुणांमध्ये समन्वय साधला जावा यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. आरक्षणाच्या प्रश्नावरून वाद घालण्याऐवजी परस्परांमध्ये संवाद साधला जावा, अशी आपली भूमिका आहे. त्याचप्रमाणे कलोशीत झालेले सामाजिक वातावरण पुन्हा सुस्थित व्हावे यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा म्हणून आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी ही चर्चा करणार आहोत, असे चव्हाण यांनी सांगितले.

जरांगे पाटील यांच्या इतर मागण्यांबाबतही मार्ग काढू

आरक्षणाबाबतच्या प्रमुख मागण्यांसह जरांगे पाटील यांच्या इतर काही मागण्या प्रलंबित आहेत. त्यावरही मार्ग काढण्याचा आपला प्रयत्न राहील. आंदोलन काळात मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे सरसकट माफ करावे, अशी जरांगे पाटील यांची मागणी आहे. आंदोलकांवर दाखल करण्यात आलेली किरकोळ स्वरूपाचे गुन्हे माफ करणे शक्य आहे. मात्र, जाळपोळ, हल्ला करणे, सार्वजनिक अथवा खाजगी मालमत्तेची तोडफोड अशा प्रकारचे गंभीर गुन्हे न्यायालयापर्यंत पोहोचले आहेत. असे गुन्हे सरसकट माफ करणे कठीण आहे. त्याबाबत काय मार्ग काढायचा हे बघावे लागेल. त्याचप्रमाणे हैदराबाद गॅझेटमधील नोंदणीबाबत मराठवाडा विभागाच्या विभागीय आयुक्तांनी सविस्तर अभ्यास केला आहे. आपण त्यांच्याकडून त्यासंबंधी माहिती मागवली आहे, असेही चव्हाण यांनी सांगितले.

# पाण्यापासून बराच काळ वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय

## आळजापूर वितरिकेच्या खुल्या कालव्या ऐवजी बंदिस्त पाईपलाईन टाकण्याच्या योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता

**फलटण :** धोम बलकवडी पाटबंधारे प्रकल्पाच्या अंतर्गत उजवा कालवा किमी ८६ मधील ६ क्रमांक ८५/२०० येथून निघणाऱ्या आळजापूर वितरिकेच्या खुल्या कालव्या ऐवजी बंदिस्त पाईपलाईन टाकण्याच्या योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून या कामासाठी २१ कोटी १८ लाख ७६ हजार ३५४ रुपये खर्चास मान्यता मिळाली आहे. लवकरच या कामाच्या निविदा निघणार आहेत आणि प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे. मा. खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या हस्ते कामाचे उद्घाटन होऊन कामास सुरुवात होणार आहे. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या कामाचे फुकटचे श्रेय विरोधकांनी घेऊ नये असा इशारा सासवडचे माजी सरपंच राजेंद्र काकडे यांनी दिला.





हे काम मंजूर होण्यासाठी सासवड, घाडगेवाडी, कापशी, आळजापूर, बिबी, मुळीकवाडी या सर्व गावातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत बंदिस्त पाईपलाईन मधून पाणी नेण्यासाठी माढा लोकसभा मा. खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर व ज्येष्ठ नेते प्रल्हादराव साळुंखे पाटील, समशेरसिंह नाईक निंबाळकर यांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करून सासवड, घाडगेवाडी, कापशी, आळजापूर, बिबी, मुळीकवाडी या सर्व गावातील पाण्यापासून बराच काळ वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे.

आळजापुर वितरीकेद्वारे एकूण १६७५.७० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.या प्रकल्पाची मूळ मान्यता १९९६ साली मिळाली होती. फेर मान्यता २००१, २००३, २००८, २०१७ पर्यंत या प्रकल्पअंतर्गत कामासाठी अनेक वेळा मान्यता मिळाल्या. परंतु यामध्ये आळजपुर डी वाय ३७ व आदर्की ३३ या कामांना प्रशासकीय मान्यता किंवा मंजुरी घेण्यात आलेली नाही. परंतु खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर हे २०१९ साली खासदार झाल्यापासूनच मी स्वतः व टाकोबाईच्या वाडीतील सुभेदार मेजर दत्तात्रय शिंदे, विक्रांत विलास झणझणे, निखिल शिवाजी काटकर तसेच घाडगेवाडीतील शंभूराज बोबडे, सुरेश साप्ते आणि मुळीक वाडीतील हणमंत मुळीक, लहुराज मोहिते व सर्व गावातील अनेक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर व संबधित अधिकारी यांच्या भेटी घेऊन या कामाचा पाठपुरावा करून माजी खासदारच्या माध्यमातून हे काम मार्गी लावले आहे व या कामास प्रशासकीय मान्यता दिनांक ३० मे २०२४ रोजी मिळाली. जल संपदा विभागाचे चे चीफ इंजिनिअर यांनी या योजनेवर १९ जुन २०२४ रोजी शिक्कामोर्तब केले.

या प्रकल्पाचे श्रेय घेणारे हिंगणगाव गटाचे माजी जि. प. सदस्य यांना अचानक जाग आली. असे काय घडले तर खासदार रणजितसिंह निंबाळकर यांचे निकटवर्तीय शंभूराज बोबडे यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंट वर या प्रकल्पातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल दिनांक १९ जुन २०२४ रोजी मा. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे आभार मानले. ते पाहून त्यानंतर माजी जि. प. सदस्य यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून न केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न चालू केला. आ .श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर साहेब यांचे २०२१ चे पत्र सोशल मीडियाचा वापर करून खोटे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. मग मी त्याचवेळेस मा. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी दिलेल्या दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिफारस केलेल्या पत्राचा उल्लेख करून व रामराजे साहेब यांच्या पत्रामध्ये डी वाय ३७ चा उल्लेख नसल्याचे जनतेच्या व फुकटच श्रेय घेणाऱ्यांच्या लक्षात आणून दिले.

तेव्हापासून माजी जि. प. सदस्य यांना आपण १० वर्षे जिल्हा परिषद सदस्य असून सुद्धा हे काम न करता आल्याची जाग आली व न केलेल्या कामाचे श्रेय घेण्यासाठी केविलवाणी धडपड करण्याचा प्रयत्न केला व सोशल मीडिया व वृत्त पत्रात खोट्या बातम्या देण्यास सुरुवात केली.

तसेच आ .श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी कसा प्रकल्प मंजूर केला व जुन्या गोष्टी सांगून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. परंतु अनेक वेळा प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांना बरोबर घेऊन व संबधित अधिकारी वेळोवेळी प्रकल्प क्षेत्रात बोलवून माहिती दिलेली आहे. त्यामुळे हा प्रकल्प कोणी केला आणि कोणाला करायचा नव्हता याची जाणीव प्रकल्पातील लाभार्थी शेतकऱ्यांना आहे. परंतु खोटे श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे आम्ही सत्य परिस्थीती लोकांसमोर मांडत आहोत असे काकडे म्हणाले.

# कृषीकन्यांद्वारे बागायती पिकांसाठी खड्डे खोदणे आणि भरणे यावर प्रात्यक्षिक



**हिंगणगाव :-** फलटण तालुक्यातील हिंगणगाव येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न फलटण एज्युकेशन सोसायटी अंतर्गत कृषी महाविद्यालय फलटणच्या कृषीकन्यांनी ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव व औद्योगिक जोड प्रकल्प २०२४-२५ कार्यक्रमा अंतर्गत बागायती पिकांसाठी खड्डे खोदणे आणि भरणे यावर प्रात्यक्षिक दिले.

कृषी कन्या कु. लोणकर प्रतिक्षा,बोडके भाग्यश्री, बोराटे शारदा,अभंग साक्षी,पावणे अर्पिता , नाळे अनुजा , सावंत मयुरी,वाघमारे संजना यांनी चिंच पीक लागवडीसाठी योग्य आकारमानाचा खड्डा खोदणे व चिंच लागवडी पूर्वी तो खड्डा विविध सेंद्रिय व रासायनिक घटक जसे की शेणखत,उसाचे पाचट ,सिंगल सुपर फॉस्फेट, कारबारील पावडर इ.ने भरून घेणे याची माहिती दिली तसेच प्रात्यक्षिक करून दाखवले .

या अंतर्गत त्यांनी चिंच लागवडीसाठी योग्य आकारमानाचा खड्डा खोदणे याचे पीक उत्पन्नसाठी होणारे फायदे याची माहिती सविस्तर दिली.तसेच खड्डा भरण्यासाठी वापरलेल्या घटकांचे पिकाच्या निरोगी वाढीसाठी असणारे फायदे ही सांगितले .यावेळी श्री,दत्तात्रय भोईटे, प्रवीण भोईटे,राजेंद्र भोईटे,नवनाथ ,भोईटे,हनुमंत भोईटे, प्रदिप भोईटे,अमोल भोईटे व आकाश भोईटे इ. उपस्थित होते.

कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यू डी चव्हाण सर, श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस डी निंबाळकर सर, समन्वयक प्रा. निलिमा धालपे मॅडम,कार्यक्रम अधिकारी - प्रा. स्वप्निल लाळगे सर, प्रा. नितीशा पंडित मॅडम यांच्या व प्रा.संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.



### जि. प.प्रा शाळा वाघोशी येथे कृषीदिनानिमित्त

# उद्यानदुतांद्वारे वृक्षदिंडी काढून वेगवेगळ्या जातीच्या रोपांचे वृक्षारोपण

**फलटण, :** फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय फलटण, ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत जि. प.प्रा शाळा वाघोशी येथे सोमवार दि. १जुलै २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता कृषीदिनानिमित्त उद्यानदुतांद्वारे वृक्षदिंडी काढून वेगवेगळ्या जातीच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये वड ,चिंच, कडुनिंब, कांचन अशी झाडे लावण्यात आली आहेत. तसेच प्रदूषण व त्यासाठी झाडांचे महत्त्व पटवून दिले.

हा उपक्रम सरपंच श्री.ताराचंद पवार शाळेचे मुख्याध्यापक श्री.आर.वी.मोहिते सर ,श्री. एस.पी.वेठेकर सर , श्री.दत्तात्रय पवार सर ,तंटामुक्ती अध्यक्ष श्री.एन.आर. शिंदे, श्री.राजेंद्र मनोहर पवार केंद्र संचालक बीबी,कृषी सहाय्यक श्री.विलास काळे,ग्रामसेवक श्री.एस.एन.शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला.तसेच तरुण भारत चे वार्ताहर श्री.विठ्ठल शिंदे हे ही या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेस ६ कोटींचा नफा,सभासदांना ६ टक्के लाभांश जाहीर

**पिंपोडे बुद्रुक :** पश्चिम महाराष्ट्रात ५३ शाखांचा विस्तार करीत सर्वांचा विश्वास संपादन केलेल्या पिंपोडे बुद्रुक ता.कोरेगाव येथील छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेस अहवाल सालात ६ कोटी ६३ लाख ढोबळ नफा झाला असून आवश्यक तरतूदी वजा जाता निव्वळ नफा ४ कोटी १ लाख ४८ हजार झालेला आहे.त्यातून सभासदांना ६ टक्के लाभांश वाटणी करण्याची शिफारस संचालक मंडळाने केली आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी संस्थेच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल वाचन करताना दिली.



पश्चिम महाराष्ट्रात अग्रेसर असलेल्या छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पिंपोडे बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज सांस्कृतिक भवनमध्ये शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ.सोपानराव चव्हाण होते.प्रारंभी मागील सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करण्यात आले.प्रास्ताविक व स्वागत करताना संस्थापक लेंभे यांनी सभेपुढे ठेवलेल्या विषयांचे वाचन केले. सभेपुढील सर्व विषयांना सभासदांनी हात उंचावून एकमताने मंजूरी दिली. गतवर्षीच्या संमिश्र व्यवसायात १६८ कोटी ८७ लाखांची वाढ झालेली असून ३१ मार्च २०२४ अखेर संस्थेचा संमिश्र व्यवसाय ११६५ कोटी ४ लाख झालेला आहे.अहवाल सालात सर्वच बाबतीत लक्षणीय वाढ झालेली असून ठेवींमध्ये ९० कोटी ५ लाखांची वाढ होऊन ३१ मार्चअखेर ६६१ कोटी २९ लाख ठेवी जमा झालेल्या आहेत.गेल्या ३५ वर्षात ही सर्वात जास्त विक्रमी वाढ झालेली असून याचे श्रेय संस्थेचे संचालक मंडळ, सल्लागार, खातेदार, ग्राहक, सभासद व सेवक वर्ग यांना जाते.गेली ३४ वर्षे प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल वाचन करताना आदर्श परंपरा लाभलेल्या या संस्थेचा अभिमान वाटतो.संस्थेचे खेळते भांडवल ७४२ कोटी ७५ लाख असून ७२७०३ सभासद संख्या आहे.संस्थेचा स्वनिधी अद्यापही कमी असून भागभांडवल वाढविणे आवश्यक आहे.त्यासाठी सर्व सभासदांनी संस्थेचे जास्तीत जास्त भाग घेऊन सहकार्य करावे असे आवाहन संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी केले.चेअरमन डॉ.सोपानराव चव्हाण म्हणाले, सेवकांना कर्जवाटप वाढ, व्यवसाय वाढीचे उद्दिष्ट दिले आहे.यावर्षी कसल्याही परिस्थितीत ६ कोटींचा नफा संस्थेस झाला पाहिजे.म्हणजे पुढील वर्षी यापेक्षा जास्त लाभांश सभासदांना देता येईल.

व्हाईस चेअरमन श्रीकांत शेटे, जेष्ठ संचालक सुरेशबापू साळुंखे, अशोकराव लेंभे यांची भाषणे झाली. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन व प्रतिमेसमोर दिपप्रज्वलन करण्यात आले. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून पिंपोडे बुद्रुक येथील जेष्ठ किर्तनकार ह.भ.प.आनंदराव लेंभे शास्त्री नाना यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन विठ्ठल माने यांनी केले. कार्यकारी संचालक भावेश ढमाळ यांनी आभार मानले.व्यासपिठावर संचालक रावसाहेब लेंभे, जयवंत घोरपडे,भरत साळुंखे, हणमंतराव निकम, तात्यासाहेब ढमाळ, संजय भोसले, श्रीमती सुलभा अरूण साळुंखे,सौ.उषा अशोकराव पवार, गौतम कांबळे, सतीश बिचुकले, नारायण सोनावणे, विजय पतसंस्थेचे चेअरमन विश्वासराव धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## पाटण शहरात महापुरूषांचे पुतळे उभारण्याची शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विकास हादवे यांची मागणी



**पाटण :** पाटण पंचायत समितीच्या आवारामध्ये समस्त बहुजन समाजाचे आदर्श व अस्मिता असलेल्या महापुरुष महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व भारतीय घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचा पुतळ्या बरोबरच तालुक्याचे सुपूत्र लोकनेते स्व. बाळासाहेब देसाई उभारण्यात यावा अशी मागणी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री, ना शंभुराज देसाई यांच्याकडे शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष विकास हादवे यांनी केली आहे.

पाटण पंचायत समितीच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांचे पुतळे उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून आहे, मात्र तांत्रिक अडचणींमुळे पुतळे उभारता आले नाहीत, अनेक वर्षापासून प्रलंबित विषयाकडे लक्ष देऊन विकास हादवे यांनी पालकमंत्री शंभूराजे देसाई यांच्याकडे पत्रव्यवहार करून महापुरुषांचे पुतळे उभारणीची विनंती केली आहे, पाटण पंचायती समोर भरपूर अशी मोकळी जागा आहे. अनेक वर्षापासून पाटण तालुक्यातील समस्त शिवप्रेमी, आंबेडकर प्रेमी जनतेकडून आराध्यदैवत येत युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा बसवण्याची इच्छा आहे. या पार्श्वभूमीवर विकास हादवे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुतळा उभारण्याची मागणी करणारे निवेदन पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे पत्रव्यवहार करून मागणी करण्यात आली. तसेच तालुक्यात कोणत्याही ठिकाणी पार्क नाही त्यामुळे नागरिकांची अनेकदा गैरसोय होताना दिसत आहे. पंचायत समिती समोरील मोकळ्या जागेत ओपन जिम होण्याची सुद्धा मागणी होताना दिसत आहे. चापोली रोड येथील मोकळ्या जागेत नाना -नाणी पार्क व्हावे अशी सुद्धा त्यांच्याकडून मागणी होत आहे. त्या महापुरुषांचा पुतळा उभारावा. जेणेकरून पाटण शहराच्या लौकिकात भर पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

## रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवनच्या अध्यक्षपदी मीनल धोत्रे



**पुणे :** रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवनच्या अध्यक्षपदी मीनल धोत्रे आणि सचिव पदी शशांक टिळक यांची नियुक्ती झाली आहे.२०२४-२५ या वर्षासाठी ही नियुक्ती आहे.पदग्रहण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल शीतल शहा, सहप्रांतपाल प्रियांका कर्णिक उपस्थित होते. या कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे अनेक पदाधिकारी, रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवनचे सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते.

येत्या वर्षात नर्मदालय, ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस आणि मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र यांच्याबरोबर भरीव सामाजिक प्रकल्प करण्याचा मनोदय अध्यक्षांनी यावेळी व्यक्त केला.कार्यकारिणीचे पदग्रहण नुकतेच दि. २ जुलै रोजी पुण्याई हॉल, कोथरूड येथे पार पडले.

# भारतीय विद्या भवन,इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम


**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत आयोजित 'विष्णवे अर्पणम' कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.या कार्यक्रमात कुचिपुडी नृत्यातून पारंपरिक रचना सादर केल्या गेल्या. हे बहारदार एकल कुचिपुडी नृत्य नाशिकच्या वैदेही कुलकर्णी यांनी सादर केले.या कार्यक्रमाचे निवेदन डॉ.शोभा सुपेकर यांनी केले.

आज आषाढ प्रतिपदा असल्याने व याच महिन्यात गुरू पौर्णिमा असल्याने, वैदेही यांनी आजच्या कार्यक्रमात त्यांच्या तिन्ही गुरू स्वर्गीय गुरू पद्मभूषण डॉ. वेमपत्ती चिन्ना सत्यम, गुरू श्रीमती मंजू भार्गवी आणि स्वर्गीय गुरू वम्पत्ती रवी शंकर या तिघांनी दिग्दर्शित केलेल्या भगवान विष्णूवरील वेग वेगळ्या अमूल्य रचना प्रस्तुत केल्या. या प्रस्तुती मध्ये सत्यभामा प्रवेश दरवू, मंडूक शब्दम, रामदास कीर्तन, कृष्णलीला तरांगिनी मधून एक तरांगम, जावली आणि तिल्लाना या प्रकारांचा समावेश होता. गणेश श्लोक, प्रार्थनेने नृत्याची सुरुवात झाली.

हा कार्यक्रम शनीवार,दि.६ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.रसिकांना तो विनामूल्य खुला होता.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१६ वा कार्यक्रम होता,अशी माहिती भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी प्रास्ताविकात दिली .

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मी सेवेकरी सोशल फाऊंडेशनच्या वतीने खेड तालुक्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन

**राजगुरुनगर (वा.) :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गट, आणि मी सेवेकरी सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ७ जुलै ) बेरोजगारांसाठी भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे आयोजन मी सेवेकरी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष, उद्योजक सुधीर मुंगसे यांनी केले आहे.



वाकी बुद्रुक येथील साईकृपा मंगल कार्यालयात रविवारी (दि.७ रोजी) सकाळी साडेनऊ ते दुपारी तीन या वेळात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे संसदरत्न खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार हे या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ बापू शेवाळे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड, रामदास धनवटे, काँग्रेसचे तालुका प्रमुख विजय डोळस, जिल्हा परिषद सदस्य संजय घनवट, अतुल देशमुख, बाबाजी काळे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अमोल पवार कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सोमनाथ मुंगसे, राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष विशाल झरेकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दहावी, बारावी पास आय. टी.आय, सर्व ट्रेड, डिप्लोमा मेकॅनिकल, डिप्लोमा इलेक्ट्रिकल, डिप्लोमा ऑटोमोबाईल, मेकॅनिकल इलेक्ट्रिकल, बीएससी, बी. कॉम. अशी शैक्षणिक पात्रता असलेल्या १८ ते ३० या वयोगटातील गरजूंना या मेळाव्यात सहभागी होता येईल. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

तसेच मुलाखती द्वारे निवडल्या गेलेल्या युवक युवतींना राज्यातील विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. आज वाढत्या बेरोजगारी मुळे तरुण मुले मुली नैराश्यग्रस्त होत आहेत. या तरुणांना नैराश्यामधून बाहेर काढून स्वतःच्या पायावर उभं करत आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे उद्योजक सुधीर मुंगसे यांनी सांगितले. खेड तालुक्यात उद्योजक मुंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, गरजूंनी याचा लाभ घेण्याचे आवाहन मी सेवेकरी सोशल फाऊंडेशनचे सुधीर मुंगसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष हिरामण सातकर यांनी केले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सृष्टी युवा फॉउंडेशनच्यावतीने पर्यावरण समतोलासाठी वृक्षारोपण



**हडपसर :** पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन सृष्टी फाउंडेशनच्या वतीने विविध जातीचे वृक्षारोपण करुन एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

निसर्ग हीच आपली संपत्ती आहे हे आपल्या पुढच्या पिढीस समजावा कारण निसर्गाशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे निसर्गाची वृक्षाची जागा काँक्रिटच्या जंगलानी घेतल्याने पर्यावरणाचा -हास होताना दिसत आहे. निसर्गाची हानी होत आहे येणा-या पिढीला चांगली हवा व ऑक्सिजन व फळे चाकण्यासाठी प्रत्येकांनी एक तरी झाड लावावे, जर आपण निसर्ग जपला , झाडे लावली तरच निसर्गाचा समतोल राहणार आहे म्हणून आपल्या येणाऱ्या पिढीसाठी पर्यावरण जपण्यासाठी झाडे लावले पाहिजे आणि त्याचे जतन केले पाहिजे असे मत निसर्ग प्रेमी रणजित गायकवाड यांनी केले. त्यांनी स्वखर्चाने मोठमोठी विविध जातीच्या झाडाची लागवड महादेव गडावर जवळपास ५५० झाडे आतापर्यंत लागवड केली आहे.विशेष म्हणजे त्याने या साठी कांही लाखाचे कर्ज घेतलं असल्याचे सांगितले आहे .केवळ आपल्या साठी नाही तर पुढील पिढीसाठी झाडे लावणे गरजेचे आहे, त्याच्या विचारा नुसार झाडांना मानवाने कितीही वेदना दिल्या तरी झाडें निःस्वार्थ पणे परोपकारी वृत्ती ने फळ फुल ऑक्सिजन सावली देत असतात म्हणून आज ५० झाडे लावली तशी प्रत्येक वर्षी हजारो झाडे लावण्याचा संकल्प आहे, झाडे लावा झाडे जगवा वृक्षारोपण संकल्प रणजीत गायकवाड व संस्थेचे अध्यक्ष राजेश भोईटे ,अरिफ मुजावर,काकासाहेब मोरे , व सदस्यांनी सुरु केला आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे साताऱ्यात मोठ्या उत्साहात स्वागत

**लोणंद :** माऊली माऊली आणि विठु नामाचा गजर, टाळ मृदंगाच्या निनादात, हरिनामाच्या जयघोषात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात आज सातारा जिल्ह्यात पाडेगाव (ता. खंडाळा) येथे आगमन झाले.

सातारा प्रशासनाच्या वतीने पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. यावेळी खासदार धैरशिल मोहिते - पाटील, आमदार मकरंद पाटील, आमदार दीपक चव्हाण, आमदार संजय जगताप, पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पुण्याचे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पोलीस अधीक्षक समीर शेख, प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, खंडाळा तहसीलदार अजित पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थामन अधिकारी देविदास ताम्हाणे, पालखी सोहळा विश्वस्त ड. राजेंद्र उमाप,



योगी निरंजन नाथ, यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखी सोहळ्याची सूत्रे सातारा प्रशासनाकडे सोपवली. पोलीस विभागाने पालखीला मानवंदना दिली. पुणे जिल्ह्यातून सातारा जिल्ह्यात आपल्या सहा दिवसांसाठी पालखी सोहळा दुपारी दीड वाजता टाळ मृदुंगाच्या गजरात मोठ्या भक्तिमय वातावरणात दाखल झाला. निरा नदीवरील प्रसिद्ध दत्तघाट येथे माऊलींच्या पादूकांना निरा स्नान घातल्यानंतर माऊलींच्या रथाचे स्वागत सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले.स्वागतानंतर पालखी सोहळा लोणंद मुक्कामी मार्गस्थ झाला.

माऊलींच्या गजरात तल्लीन होऊन नवीन वारकरी नाचत होते. भाविकांच्या प्रचंड उत्साहाने माऊलींचा पालखी सोहळा भक्ती सत भक्तीरसात चिंब होऊन गेला. पालखी रथातून उतरवून खांद्यावर घेऊन लोणंदकर ग्रामस्थांनी वाजतगाजत साडेपाच वाजण्याच्या सुमारास पालखीतळावर पोहचवली. पालखी तळावर सर्व पालख्या गोलाकार उभ्या केल्यानंतर चोपदारांनी दंड उंचावल्यानंतर सर्व दिंड्या शिस्तीत ऊभ्या राहील्या यानंतर वारकऱ्यांना सूचना देण्यात आल्यानंतर सायंकाळची समाज आरती होऊन अडीच दिवसांच्या लोणंद मुक्कामी पालखी सोहळा विसावला. यानंतर पादुकांचे दर्शन घेण्यासाठी सातारा, कराड, सांगली, कोल्हापूर,कोकण पासून आलेल्या भाविकांनी मोठी गर्दी केली.

पालखी सोहळ्यासाठी सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनानुसार निरा विसावा पासून लोणंद अशी चोख बंदोबस्ताची व्यवस्था केली. तसेच संपूर्ण पालखी काळात वेगवेगळ्या पथकांद्वारे लोणंद , फलटण व बरड पर्यंतच्या पालखी बंदोबस्ताचे नियोजन सातारा पोलीसांकडून करण्यात आले आहे.

# लाडक्या बहिणीसाठी शून्य रुपयात सातारा जिल्हा बँक महिलांचे खाते उघडणार : नितीन पाटील

**सातारा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी महिलांना शून्य रुपयात बँक खाते उघडून देणार असल्याची माहिती सातारा जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील यांनी दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना शासनाने दि १ जुलै पासून सुरू केली आहे .बँक खात्या अभावी महिलांचे नुकसान होऊ नये व खाते उघडताना त्यांना आर्थिक भुर्दंड पडू नये यासाठी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने हा निर्णय घेतला असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

या महिलांची 'झिरो बॅलन्स' (शुन्य शिल्लक) खाती बँकेच्या सर्व शाखांमध्ये तात्काळ उघडून घेणेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे . हे खाते उघडणेसाठी महिलांनी खाते उघडणेचा फॉर्म , २ फोटो, आधार कार्डची प्रत इ. कागदपत्र आवश्यक राहतील .

जिल्हयात बँकेच्या ३०७ शाखा व १२ विस्तारीत कक्षाद्वारे ग्राहकांची सेवा बँक करीत आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जिव्हाळ्याची सेवा देण्यास सदैव तत्पर आहे. बँकेचे सर्व ठेवीवरील व्याजदर अत्यंत आकर्षक असून रू. ५ लाखापर्यंतचे सर्व ठेवींना विमा संरक्षण आहे . बँकेने कर्ज वसूलीचे कामकाज सातत्याने प्रभावशाली केलेने गत १७ वर्षे बँकेच्या निव्वळ अनुत्पादक कर्जाचे (एनपीए) प्रमाण शून्य टक्के राखले आहे .

या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घेणेसाठी 'झिरो बॅलन्स' (शुन्य बाकी) खाती आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन उघडून घेणेसाठी बँकेच्या नजिकचे शाखेमध्ये संपर्क साधावा .असे आवाहन बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील , उपाध्यक्ष अनिल देसाई, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे यांनी केले आहे .

# हांडेवाडी मुख्य चौक रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर वाहतूक कोंडी

**हडपसर :** हांडेवाडी चौक रस्ता ते हडपसर हांडेवाडी रोड रस्त्यावर रोज सकाळ संध्याकाळी वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. वाहतूक कोंडी तासन तास होत असल्याने वाहतूक कोंडीत नागरीकांचा वेळ व.इंधन वाया जात असल्याचे नागरीक सांगत आहेत.हांडेवाडी रोडवर मंगल कार्यालय संख्या जास्ती असल्या मुळे लग्न कार्यासाठी आलेले वाहाने रस्त्यावर पार्किंग करीत असल्यामुळे नागरीकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.बेकायदेशीर रोड वर वाहाने पार्किंग करणा-यावर कारवाई होणार का नाही हा प्रश्न सामान्य नागरिक ना पडत आहे व


ाहतूक नियमन करणा-या पोलीसांचे यावर नियत्रण नाही, मोठ्या पैसे वाले राजकीय लोकांना सोडुन देतात व गोरगरिबं सामान्य नागरिक वंर कारवाई करत आहेत सामान्य नागरिकांनी न्याय कोणाकडे मागयचा या पुढे सामान्य गोरगरिबं नागरिकांना त्रास झाला तर वाहतूक विभाग कार्यालयासमोर अंदोलन करु

असा इशारा एकता युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते याभागातील स्थानिक नागरिक विशाल धावारे यांनी दिला आहे.

# वरंधा घाटात वारवंड-शिरगाव जवळ दरीत पिकअप कोसळली

**भोर :** महाड वरून वरंधा घाटातून भोरकडे आंब्याच्या झाडाची रोपे भरून येणारी पिकअप २०० फूट खोल दरीत कोसळून अपघात झाल्याची घटना शुक्रवार (दि.५) रोजी पहाटे घडली. अपघातात पिकअप चालक व इतर एक जण यांनी सावधानता बाळगून गाडीतून उड्या मारल्याने जीवित हानी टळली.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार पिकअप गाडी महाडवरून आंब्याची झाडे भरून भोर येथे येत असताना वरंधा घाट रस्त्याच्या वळनांचा चालकाला अंदाज न आल्याने गाडी धरणाच्या बाजूला खोल दरीत कोसळली.पिकअप गाडी कोसळताना मोठमोठ्या झाडांवर



आढळून खोल दरीत पडल्याने गाडीचे मोठे नुकसान झाले.नशीब बलवत्तर म्हणून चालक व इतर एक जन बचावला.मागील वर्षी घाट रस्त्यावर वाहनांच्या वाहतुकी दरम्यान वेगवेगळ्या झालेल्या अपघातात ३ जणांना जलसमाधी मिळाली होती.तर एका बस चालकाचा बस झाडाला धडकून दरित कोसळल्याने मृत्यू झाला होता.सध्या वरंधा घाट माथ्यावर मागील आठ दिवसांपासून पावसाची रिमझिम सुरू आहे. पावसामुळे रस्त्यावर काहीशा प्रमाणात माती व पाणी येऊन रस्ता चिखलमय झाला असल्याने वाहने घसरत आहेत.तर रात्रीच्या वेळी बहुतांशी वाहनचालक बेजबाबदारीने घाट रस्त्यावरून वाहने चालवत असल्याने वारंवार वरंधा घाटात छोटे-मोठे अपघात घडत असल्याचे चित्र आहे.

# महादेव जानकरांची मोठी घोषणा; आता 'या' मतदारसंघातून लोकसभा लढवणार



लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला फारसं यश मिळवता आलं नाही. ४८ मतदारसंघापैकी महायुतीला फक्त १७ जागा निवडणून आणण्यात यश आलं. त्यामुळे महाराष्ट्रात महायुतीला धक्का बसला. लोकसभा निवडणुकीत परभणी लोकसभा मतदारसंघ चांगलाच चर्चेत होता. परभणी लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून रासपचे नेते महादेव जानकर यांनी निवडणूक लढवली होती. त्यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनी सभाही घेतल्या होत्या. मात्र, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय जाधव यांनी मोठ्या मताधिक्यांनी महादेव जानकरांचा पराभव केला.

यानंतर आता रासपचे नेते महादेव जानकर यांनी मोठी घोषणा केली आहे. पुढची लोकसभा निवडणूक बारामती लोकसभा मतदारसंघामधून लढवणार असल्याचं महादेव जानकर यांनी म्हटलं आहे. मी डेफिनेटली खासदार होणार, बारामतीसाठी माझी तयारीही सुरु आहे, असं महादेव जानकर यांनी अकोला जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं आहे.

**महादेव जानकर काय म्हणाले?**

आता पुढच्या निवडणुकीसाठी माझी बारामतीसाठी तयारी चालली आहे. बारामती मतदारसंघातूनच पुढचा निकाल लागणार आहे. मी महाराष्ट्रातील पाच लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढलो. नांदेड, सांगली, माढा, बारामती आणि परभणी या मतदारसंघातून लोकसभा लढलो. मात्र, पाचही ठिकाणी माझा पराभव झाला. पण माझं मतदान लाखांनी वाढत चाललं आहे. कमी होत नाही. माझा रनरेट वाढत चालला आहे, असं महादेव जानकर यांनी म्हटलं आहे.

जानकर पुढं म्हणाले, पक्षालाही (रासप) मान्यता मिळत चालली आहे. आज आपल्या पक्षाचा विधानसभेत आमदार आहे. विधानपरिषदेत आमदार आहे. विदर्भात आम्ही कमी आहोत. मात्र, विदर्भातील वर्धा आणि गडचीरोलीमध्ये काही जिल्हा परिषद सदस्य आहेत. वर्ध्यामध्ये एक जिल्हा परिषद सदस्य तर गडचीरोलीमध्ये ७ जिल्हा परिषद सदस्य आहेत. अमरावती, अकोला असेल किंवा वाशिम आणि बुलढाणा या ठिकाणी आपण शून्य आहोत. लोणारमध्ये एक नगरपालिका लढवली होती. पण तेथे यश मिळालं नाही, असं महादेव जानकर यांनी म्हटलं आहे.

# उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरातच व्हावे, पुण्यासाठीचा अशासकीय ठराव अनावधानाने : आ. विश्वजित कदम

**सांगली :** कोल्हापूरला उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे अशीच आपली भूमिका असून शुक्रवारी विधानसभा कामकाजात पुण्याला खंडपीठ व्हावे असा दिलेला अशासकीय ठराव अनावधानाने दिला होता. तसे पत्र अध्यक्षांना सोमवारी देणार असल्याचे आ. डॉ. विश्वजित कदम यांनी निवेदनाद्वारे सांगितले. आ. कदम यांनी आपल्या निवेदनात म्हंटले आहे की, पुणे हा उल्लेख अनवधानाने झाला असून सोमवारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्र देऊन मी त्याबद्दलचे स्पष्टीकरण देणार आहे.

कोल्हापूरला खंडपीठ व्हावे ही संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राची जनभावना आहे आणि आपण त्या जनभावने सोबतच आहोत. कोल्हापूर येथे खंडपीठ झाले तर ते सांगली, सातारा, कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्यासाठी उपयुक्त होणार आहे याबद्दल माझ्या मनात शंका नाही. सांगली सह पश्चिम महाराष्ट्रातील विविध शिष्टमंडळांना मी व्यक्तिशः देखील याबाबतीत भेटी दरम्यान आश्वस्त केलेले आहे. त्यामुळे कोल्हापूर खंडपीठ व्हावे याबद्दल माझा आजिबात विरोध नाही आणि याप्रश्री महाराष्ट्र शासनाकडे ही भूमिका मी पुढाकाराने मांडण्यास मागे राहणार नाही.

खंडपीठाच्या बाबतीतील प्रामाणिक भूमिकेतून मी अशासकीय ठराव आणला होता. मात्र अनवधानाने त्यात चुकीचा उल्लेख आहे. या विषयावर सभागृहात कामकाज झालेले नाही. कोल्हापूर खंडपीठ प्रयत्नांना खीळ बसू नये म्हणून आपण सोमवारीच तसे पत्र अध्यक्ष महोदयांना देणार आहोत. त्यामुळे या चळवळीत कार्यरत असणाऱ्या वकील, पक्षकार आणि सर्वसामान्य जनतेने विचलित न होता आपले प्रयत्न सुरू ठेवावेत. त्यांच्या प्रयत्नांना यश यावे म्हणून जी काही जबाबदारी आपणास पार पाडावी लागेल ती निःसंकोचपणाने पार पाडण्यात मी मागे राहणार नाही. आपल्या भूमिकेत कोल्हापूर मागणीला छेद देण्याचा हेतू नव्हता आणि हा विषय प्रलंबित रहावा अशी आपली भूमिका कधीही नव्हती. त्यामुळे नजीकच्या काळात मुख्यमंत्री आणि राज्य शासनासह उच्च न्यायालयाने इथल्या जनतेच्या भूमिकेला मान देऊन तातडीने कोल्हापूर खंडपीठ स्थापन करावे, त्यासाठी उपयुक्त सर्व सुविधा कोल्हापूर शहरात आहेत, इथल्या संपन्न प्रदेशात होणाऱ्या खंडपीठाने न्याय विनाविलंब मिळण्यास मदत मिळेल आणि मुंबईत जाण्यापासून राहण्या खाण्यापर्यंतच्या खर्चाची बचत होईल. ही बाब या भागाचा लोकप्रतीनिधी म्हणून मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊन यावर निर्णयासाठी सक्रिय सहभागीराहीन. कोणीही गैरसमज करून घेऊ नये.

# सोलापुरात भिशी व फायनान्सच्या माध्यमातून २.६९ कोटींची फसवणूक

**सोलापूर :** भिशी चालवून आणि स्वतःच्या फायनान्स कंपनीमध्ये जास्त व्याजाचे आमीष दाखवून १३२ ठेवीदारांना दोन कोटी ६९ लाख १९ हजार रूपयांचा गंडा घातल्याप्रकरणी एका दाम्पत्याविरूध्द सोलापुरात पोलिसांनी फसवणूक व महाराष्ट्र ठेवीदार संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे.

रमेश अंबादास चिप्पा व त्याची पत्नी सुजाता चिप्पा (रा. खुशी रेसिडेन्सी, गीता नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) अशी या गुन्ह्यातील आरोपी दाम्पत्याचे नाव आहे. यात फसवणूक झालेल्या शिवाजी लक्ष्मण आवार (रा. साईबाबा चौक, सोलापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार १ नोव्हेंबर २०२० ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला.

रमेश चिप्पा व त्याची पत्नी सुजाता यांनी श्री ओमसाई फायनान्स नावाची कंपनी सुरू केली होती. त्यासोबत भिशीही चालविली होती. भिशीच्या माध्यमातून सुरूवातीला चोख व्यवहार करून चिप्पा दाम्पत्याने सदस्यांचा विश्वास संपादन केला. नंतर या माध्यमातून संपर्कात आलेल्या मंडळींना श्री ओमसाई फायनान्स कंपनीत भरपूर व्याज देण्याचे आमीष दाखवून ठेवीच्या आर्थिक गुंतवणूक करण्याची गळ घातली. यातही सुरूवातीला जादा व्याज देऊन चिप्पा दाम्पत्याने ठेवीदारांना जास्त ठेवी जमा करण्यासाठी आकृष्ट केले.

# सामना अजून संपलेला नाही, कोण कोणाची विकेट घेतं हे; ठाकरे गटाचा मुख्यमंत्री शिंदेंना इशारा

**मुंबई :** विधानसभेची निवडणूक येत्या काही महिन्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष आतापासून तयारीला लागले आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने नेते मंडळी मतदारसंघांचा आढावा घेत असल्याचं पाहायला मिळत आहे. तसेच सध्या महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. विधानसभेच्या जागा वाटपाबाबतही चर्चा होत आहेत. यातच महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण रंगलं आहे.

यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल टी-२० विश्वचषकात विजय मिळवलेल्या भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंच्या विधानभवनातील सत्कार सोहळ्यात बोलताना उद्धव ठाकरेंवर खोचक टीका केली. आमच्या ५० जणांच्या टीमने दोन वर्षापूर्वी काढलेली विकेट कुणीही विसरू शकणार नाही. दोन वर्षांपासून आम्ही सर्व बॅटिंग करत आहोत, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं होतं. यावर आता ठाकरे गटाकडून प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. सामना अजून संपलेला नाही, कोण कोणाची विकेट घेतं हे निवडणुकीत कळेल, अशा इशारा ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी मुंख्यमंत्री शिंदे यांना दिला आहे. ते माध्यमांशी बोलत होते.

अंबादास दानवे काय म्हणाले?

सामना संपलेला नाही. विधानसभेची निवडणूक पूर्ण होईल, त्या दिवशी सामना संपेल. मग त्या दिवशी कळेल की कोणी कोणाची विकेट घेतली. कोणी कोणाला निवृत्त करायला भाग पाडलं. कोणाला जनतेनं नाकारलं. मला असं वाटतं की, विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल लागतील त्या दिवशी सर्व चित्र स्पष्ट होईल, असं अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले होते?**

भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंच्या विधानभवनातील सत्कार सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले होते, माझ्या आधी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी चांगलीच बॅटिंग केली. आमचं राजकारण क्रिकेटसारखंच आहे. यातही कुणी, कुठे, कशी विकेट घेईल काही सांगता येत नाही. जसं सूर्यकुमारचा कॅच कुणी विसरू शकत नाही, तसं आमच्या ५० जणांच्या टीमने दोन वर्षापूर्वी काढलेली विकेट कुणीही विसरू शकणार नाही. दोन वर्षांपासून आम्ही सर्व बॅटिंग करतोय. क्रिकेटपासून लोकांना जो आनंद मिळतो, तसाच आनंद राज्यातील जनतेच्या चेहऱ्यावर खुलावा, असा आमचा प्रयत्न आहे. क्रिकेट हा खेळ कुठल्याही जाती-धर्माचा नाही. आमच्या राजकीय क्षेत्रात मात्र कोण कधी कुणाला बाद करेल, कुणाला रन आऊट करेल, हे सांगता येत नाही, असं म्हणत मुख्यमंत्री शिंदे यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती.

# नाना पटोलेंचा मुख्यमंत्री शिंदेंना टोला

**मुंबई :** विधानसभेची निवडणूक काही महिन्यांवर आली आहे. त्या अनुषंगाने राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. सध्या महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. यामध्ये विधानसभेच्या निवडणुकीत जागा वाटपाचा फॉर्म्युला कसा असणार? याबाबात चर्चा होत आहेत. असे असताना आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. आता ७० दिवसांनंतर खरी मॅच सुरु होणार आहे. ही मॅच लपवाछपवीची नाही तर जनतेच्या दरबारातील मॅच आहे, असा टोला नाना पटोले यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना लगावला. तसेच नाना पटोले यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनची निवडणूक लढवण्यासंदर्भातही मोठं विधान केलं आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचं काही दिवसांपूर्वी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यामुळे मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जागा रिक्त आहे. या जागेसाठी लवकरच निवडणूक पार पडणार आहे. आता या जागेवर नाना पटोले निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. याबाबत त्यांनी सूचक भाष्यही केलं आहे. यावर बोलताना नाना पटोले म्हणाले, महाराष्ट्रामध्ये अनेक तळागाळातील खेळाडू आहेत. त्यांना आजही संधी मिळत नाही. भारतात उद्याच्या काळात चांगले खेळाडू तयार व्हावे. पुढच्या येणाऱ्या पिढीला संधी मिळावी, असं आमचं स्वप्न आहे. त्यामुळे या मुंबई क्रिकेट असोसिएशनची निवडणूक लढवायची की नाही? याचा निर्णय येत्या आठवड्यात आम्ही घेणार आहोत, असं नाना पटोले म्हणाले आहेत.

# आषाढी वारीसाठी ३,८० लाख रुपयांची औषध खरेदी, स्थानिक स्तरावर तातडीने खरेदी करण्यास मान्यता



**मुंबई :** आषाढी वारीनिमित्त मुख्य १२ पालख्यांसह हजारो पालख्या राज्याच्या विविध भागातून पंढरपूरच्या दिशेने रवाना झाल्या आहेत. या पालख्यांमध्ये १५ लाखांपेक्षा अधिक वारकरी सहभागी झाले आहेत. 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत सरकारकडून वारकऱ्यांना उत्तम आरोग्य सेवा पुरवण्यात येत आहे. वारकऱ्यांच्या उपचारासाठी औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी स्थानिक स्तरावर ३,८० लाखांची औषधे खरेदी करण्यास सरकारने मंजूरी दिली आहे.

'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरवण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येकी पाच किलोमीटर अंतरावर एक याप्रमाणे २५८ आपला दवाखाने तात्पुरत्या स्वरुपात सुरू केले आहेत. वारकऱ्यांच्या तपासणीसाठी ६ हजार ३६८ इतके अधिकारी व कर्मचारी, १३६ स्त्री रोग तज्ज्ञ, रुग्णवाहिका, ८७ अतिदक्षता विभाग सुरू केले आहेत. या सुविधेच्या माध्यमातून आतापर्यंत ३ लाख १४ हजार ४९९ वारकऱ्यांना मोफत उपचार करण्यात आले आहेत. त्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराज दिंडीतील १ लाख ७३ हजार ७३७ वारकऱ्यांवर तर श्री संत तुकाराम महाराज दिंडीतील १ लाख १ हजार ३९ वारकऱ्यांवर उपचार करण्यात आले आहेत.

वारीदरम्यान आरोग्य समस्या निर्माण होणाऱ्या वारकऱ्यांची संख्या लक्षात घेता औषधे व अन्य साधन सामुग्रीचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने स्थानिक स्तरावर तातडीने औषध खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा नियोजन समितीकडून मिळणाऱ्या निधीतून ही औषधे खरेदी करण्यात येणार आहेत. स्थानिक स्तरावर औषध खरेदीसाठी पुणे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना ३५ लाख तर सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी यांना ३५० लाख रुपये एवढा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे वारीदरम्यान वारकऱ्यांना अधिक चांगल्या पद्धतीने उपचार मिळण्यास मदत होणार आहे.

## 'ओबीसी'तून मराठा आरक्षण कधीच शक्य नाही! प्रा. लक्ष्मण हाके यांची भूमिका

पुणे : मनोज जरांगे हे प्रत्येक आंदोलनात वेगळी भूमिका मांडतात. इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) बेकायदा प्रमाणपत्र वाटप होत असून हे घटनाविरोधी आहे. हा प्रयत्न म्हणजे सामाजिक आरक्षण चोरण्याचा प्रकार आहे. मात्र, ओबीसीतून मराठा आरक्षण कधीच साध्य होणार नाही, अशी भूमिका ओबीसी आरक्षणाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी मांडली. चित्रपट काढून ओबीसींवर दबाव टाकण्यात येत असून हे राज्यघटनेच्या विरोधी आहे. राज्यघटनेने दिलेले ओबीसी आरक्षण कोणीही हटवू शकत नाही, असेही हाके यांनी स्पष्ट केले.

## पिंपरी- चिंचवडमध्ये शरद पवारांची होणार भव्य सभा, करणार मोठं शक्तिप्रदर्शन!

पिंपरी- चिंचवड: राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचा बालेकिल्ला म्हणून आज ही पिंपरी-चिंचवडचं नाव घेतलं जातं. याच बालेकिल्ल्यात आता शरद पवार गटाची ताकद वाढत आहे. २० जुलै रोजी शरद पवार यांची भव्य सभा होणार असून शक्तिप्रदर्शन केलं जाणार आहे. सभेला २० हजार कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी दिली आहे.

अजित पवार आणि पिंपरी-चिंचवडचं नातं सर्वांना परिचित आहे. शहराचा विकास हा अजित पवारांनी केला असं वारंवार म्हटलं जातं. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन गट पडल्यानंतर अजित पवारांची शहरातील ताकद कमी होताना दिसत आहे. अजित पवारांच्या पाठीशी ठाम उभे असलेले अनेक जण लोकसभेच्या निवडणुकीनंतर शरद पवार गटात जाण्याच्या तयारीत आहेत. विधानसभा आणि महानगर पालिका निवडणुका या खुणावत असल्याने शरद पवार गटात चाचपणी होत आहे. अशातच आता शरद पवार गट मोठं शक्ती प्रदर्शन करण्याच्या तयारीत आहे.

शहराच्या मध्यवर्ती असलेल्या ठिकाणी शरद पवार यांची भव्य सभा होणार असून जुने आणि नवीन अशी मोट बांधण्यासाठी शरद पवार येणार असल्याची माहिती तुषार कामठे यांनी दिली आहे. जुने पदाधिकारी आणि कार्यकर्ते शरद पवारांच्या सोबत आहेत. तरुण (नवे) आणि जुने कार्यकर्ते, पदाधिकारी यांची मोट बांधून पिंपरी- चिंचवड शहरातील तिन्ही विधानसभेसाठी शरद पवार गट आग्रही आहे. अजित पवार गटाचे नव्वद टक्के माजी नगर सेवक हे शरद पवार गटाच्या संपर्कात आहेत. असं छातीठोकपणे तुषार कामठे सांगत आहेत. त्यामुळं आगामी काळात अजित पवार गटाची डोकेदुखी आणखी वाढू शकते.

## पन्हाळा-पावनखिंड मोहिमेला प्रारंभ हिल रायडर्स डव्हेंचर फाउंडेशनच्या वतीने आयोजन : हजार जणांचा सहभाग

**पन्हाळा :** दाट धुके, गार वारा व पावसाच्या सरी अशा निसर्गरम्य वातावरणात 'जय भ वानी... जय शिवाजी... शिवाजी महाराज की जय.., हर... हर... `व... नरवीर शिवा काशिद व बाजीप्रभू देशपांडे की जय...' या घोषणांनी संपूर्ण पन्हाळगड दणाणून गेला होता. ऐतिहासिक वातावरणात हिल रायडर्स फाउंडेशनच्या ६८ व्या पन्हाळगड ते पावनखिंड पदभ्रमंतीचा प्रारंभ झाला.



**पदभ्रमंतीच्या मोहिमेची सुरुवात करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळचे प्रादेशिक अधिकारी अंकुश पाटील,सचिन हरबट, असिफ मोकाशी व मान्यवर**

या मोहिमेचा प्रारंभ प्रमुख पाहुणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळचे प्रादेशिक अधिकारी अंकुश पाटील,सचिन हरबट हिल रायडर्स अडव्हेंचर फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रमोद पाटील, पन्हाळाचे माजी नगराध्यक्ष असिफ मोकाशी, घोडावत ग्रुपचे प्रवीण डिग्रजे,यांच्या हस्ते वीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाला. यावेळी हिलरायडर्सचे सागर बगाडे, विनोद कांबोज, बंडा साळोखे आदी उपस्थित होते. मोहिम सुरू करण्याच्याअगोदर सकाळी पन्हाळगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या नेबापूर येथील नरवीर शिवा काशिद समाधीला प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

अतिशय खडतर स्थितीत शिवाजी महाराजांनी काळोखात धो-धो पावसात पन्हाळगड ते पावनखिंड गनिमी कावा मोहीम सर केली होती. या मोहिमेत वीर बाजी प्रभू देशपांडे आणि वीर शिवा काशीद यांच्यासह अनेक मावळ्यांनी बलिदान दिले.स्वराज्य स्थापनेसाठी राज्यांचा त्याग आणि मावळ्यांचे बलिदान शिवकालीन इतिहास आजच्या युवा पिढीला समजावा यासाठी हिल रायडर्स अडव्हेंचर फाऊंडेशन,कोल्हापूर जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हाळगड ते पावनखिंड पदभ्रमंती ट्रेकिंग मोहीम आयोजित करण्यात आली पन्हाळगड ते पावनखिंड मोहिमेत एकहजार इतक्या मोठ्या संखेने युवक युवती सहभागी झाल्या होत्या. यावेळी यां मोहिमेत मुकबधिर असलेले पंधरा विदयार्थी सहभागी झाले. तसेच यां मोहिमेत मुलुखगिरी ग्रुपच्या वतीने मुख्यमंत्री साहेब लक्ष द्या विशाळगडाला मुक्ती द्या, एक-एक इंच जमिनीचा हिशोब घ्या, विशाळगडाला मोकळा श्वास द्या,सर्वांचे लक्ष विशाळगडाकडे अशा अशायाचे फलक घेऊन युवक सहभागी झाले होते.

## खोकल्याचं औषध समजून किटकनाशक प्राशन केल्याने शाळकरी मुलाचा दुर्दैवी मृत्यु

**कोल्हापूर :** खोकल्याचे औषध समजून किटकनाशक प्राशन केल्याने शाळकरी मुलाचा मृत्यु झाला. सदरची घटना राधानगरी तालुक्यातील आमजाई व्हरवडे गावामध्ये घडली.वेदांत अशोक पाटील (वय ११) असे या दुर्दैवी मुलाचे नाव असून शाळेला जात असताना गडबडीत त्याने खोकल्याचे औषध समजून शेतावर फवारण्यासाठी आणलेले किटकनाशक प्राशन केले.

शाळेत गेल्यावर त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने त्याला तातडीने सीपीआर दवाखान्यामध्ये पाठवण्यात आले. पण उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला. त्याच्या या मृत्युने कुटुंबाला मोठा धक्का बसला असून गावावर शोककळा पसरली आहे.



## सीपीआर रुग्णालयात उघडयावर जैव वैद्यकीय कचरा टाकल्याने रुपये ५० हजार दंड

**कोल्हापूर :** छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयामध्ये डी.एम. एन्टरप्राईझेस या कंपनीने उघडयावर जैववैद्यकीय कचरा टाकल्याने त्यांना महापालिकेने रुपये ५० हजार दंड केला आहे. शनिवारी सकाळी १० वाजता महानगरपालिकेचे आरोग्य पथक छत्रपती प्रमिला राजे रुग्णालय परिसरात स्वच्छतेबाबत पाहणी करण्यासाठी गेले होते.

यावेळी या पथकाला रुग्णालयाच्या आवारात जैव वैद्यकीय कचरा उघडयावर टाकल्याचे निदर्शनास आले. या रुग्णालयात डी.एम. एन्टरप्राईझेस या कंपनीमार्फत स्वच्छता व कचरा संकलन करण्यात येते.

हि कारवाई सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक मनोज लोट, ऋषीकेष सरनाईक, नंदकुमार पाटील व कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात आली.

## धक्कादायक! सूरतमध्ये इमारत कोसळली, ७ जणांचा मृत्यू; रात्रीपासून रेस्क्यू ऑपरेशन सुरू

सूरत : सूरतच्या सचिन पाली गावात शनिवारी (६ जुलै) धक्कादायक घटना घडली आहे. सहा मजली इमारत कोसळली, त्यामुळे अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले. अग्निशमन दल आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून ते रात्रभर रेस्क्यू ऑपरेशन करत आहेत. याच दरम्यान, सूरतचे मुख्य अग्निशमन अधिकारी बसंत पारीक यांनी सांगितलं की, रात्रभर चाललेल्या शोध मोहिमेत सात मृतदेह सापडले आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेस्क्यू ऑपरेशन सुरू आहे, अजूनही बरेच लोक ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता आहे. ही जुनी इमारत होती, त्यामुळे अचानक कोसळली असल्याचं सांगण्यात येत आहे. या सहा मजली इमारतीत ३५ खोल्या असून त्यात पाच ते सात कुटुंबं जीव धोक्यात घालून राहत होती. मिळालेल्या माहितीनुसार, या संपूर्ण इमारतीची मालक एक विदेशी महिला आहे.

इमारत कोसळण्या मागचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मुसळधार पावसामुळे जुनी झालेली इमारत कोसळल्याचं सांगण्यात येत आहे. सूरतचे पोलीस आयुक्त अनुपम सिंह गेहलोत यांनी सांगितलं की, इमारत कोसळल्याची माहिती मिळाल्यानंतर मदतकार्य सुरू करण्यात आलं. अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी मदत आणि बचावकार्य सुरू आहे. एनडीआरएफची टीम मेहनत घेत आहे.

अनुपम सिंह गेहलोत पुढे म्हणाले की, ही इमारत २०१६-१७ मध्ये बांधण्यात आली होती. सुमारे पाच फ्लॅटमध्ये लोक राहत होते, त्यापैकी बहुतेक लोक या भागातील कारखान्यांमध्ये काम करत होते. जेव्हा बचावकार्य सुरू झाले तेव्हा आम्हाला अडकलेल्या लोकांच्या ओरडण्याचा आवाज आला. घटनेच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. तपास अहवालाच्या आधारे दोषींवर कारवाई केली जाईल असं अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.



कास तलाव अखेर भरले.

## कास पुष्प पठारावर पावसाळी पर्यटन खुले, फुलांच्या क्षेत्रात फिरण्यास बंदी

**पेट्री :** जागतिक वारसास्थळकास पठारावरकास पठारकार्यकारी समिती, वनविभागाच्यावतीने पर्यटकांसाठी पावसाळीपर्यटनसुरू झाले असून पुष्प पठाराचे सौंदर्य स्वानुभवताना पर्यटकांत उत्साहाचे वातावरण आहे. नैसर्गिक मंडपघळ, भदार तळे, मचान, कुमुदिनी तलाव विविध पॉईंटकडे पर्यटक आकर्षित होत आहेत.



निसर्गरम्य परिसर, चोहोबाजूला दाट हिरवीगार झाडी, पावसाची संततधार, धुक्याची दुलई, कोसळणारे धबधबे, निसर्गाचे वरदान असलेल्या कास पठार, कास धरणपर्यटनस्थळीजिल्हा, राज्यभरातून पर्यटकांची वर्दळ सुरू असून पठारावरील विविध पॉईंट पाहण्याची मागणी पर्यटक करत होते. फुलांच्या राखीव क्षेत्रात पर्यटक जाऊ नयेत यासाठी सुरक्षिततेसाठी कर्मचारी दिवसभर कर्तव्य बजावत आहेत. पठाराचे संवर्धन, संगोपन करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात शुल्क आकारणी सुरू आहे.

जुन-ऑक्टोबर दरम्यान तृण, कंद, वेली, वृक्ष, झुडपे, आर्किड, डबक्यातील वनस्पतींना अत्यंत आकर्षक निळ्या, जांभळ्या, लाल रंगाची फुले येतात. मध्य ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये विविधरंगी दुर्मिळ फुलांचे गालिचे पर्यटकांना आकर्षित करतात. काही तुरळक फुलांचा, कुमुदिनीच्या फुलांचा सूर्योदय मावळेपर्यंत नोव्हेंबर जातो.

फुलांसाठी सध्या पोषक वातावरण असून अद्याप फुलांचा हंगाम सुरू नसून ऑगस्टमध्ये सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. फुलांचा हंगाम सुरू होईपर्यंत पावसाळी पर्यटनात प्रति व्यक्ती पन्नास रुपये शुल्क आकारून सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने राजमार्गावरून कुमुदिनी तलाव, कास धरण दर्शन मचान, नैसर्गिक मंडपघळ, भदार तळे पॉईंट पर्यटकांसाठी खुले झाल्यामुळे पर्यटकांना कासचे पर्यटन घडत आहे.

## सिग्नेट पब्लिक स्कूल (न्यू) मध्ये नवीन विद्यार्थी संसदेचा पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न

**पुणे:** सिग्नेट पब्लिक स्कूल (न्यू) मध्ये विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची मूल्य रुजवण्यासाठी, त्यांच्या नेतृत्वगुणांना वाव देण्यासाठी प्रो. डॉ. तानाजीराव सावंत यांचे मार्गदर्शन व संस्थेचे विश्वस्त ऋषिराज सावंत यांचे सहकार्याने विद्यार्थी संसदेचा पदग्रहण समारंभ नुकताच पार पडला.

शालेय वर्ष २०२४-२५ साठी विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली. शाळेमध्ये निवडणूक पद्धतीने सांस्कृतिक प्रतिनिधी, क्रीडा प्रतिनिधी, असेच विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहाय्यक पोलीस उपायुक्त जगदीश सातव, कॅम्पस डायरेक्टर डॉ. शशिकांत थिटे, कॅम्पस कोऑर्डिनेटर विकास जाधव प्राचार्या डॉ. अजिता परबत यांच्या हस्ते नवीन विद्यार्थी संसदेचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला. शाळेच्या प्राचार्यांकडून नवनिर्वाचित विद्यार्थी संसदेने पदग्रहणानंतर पदनिष्ठा अधिष्ठ आणि जबाबदारीची शपथविधी पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा होमकर ,स्वरदा पाटील



आणि ईश्वरी पिंपळे या विद्यार्थिनींनी केले. संस्थेचे विश्वस्त ऋषिराज सावंत, शाळेच्या प्राचार्य डॉ.अजिता परबत, मुख्याध्यापिका सीमा यादव, पालक शिक्षक संघाचे सभासद, शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.